नियमित फौ. ख. क्र. ३२/२०१९
सरकार -वि.- राजेंद्र शिंदे व इतर
नि.क्र. ८३.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.५ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - गजानन नत्थूजी गोंगल,
वय ५० वर्षे, व्यवसाय – शेती,
राहणार – सालेभट्टी, ता. भिवापूर, जि. नागपूर.

**सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एस.मोरे यांचे मार्फत**

१. मी आरोपींना ओळखत नाही. घटनेची तारीख मला आठवत नाही. घटनेबाबत मला काहीही माहीत नाही. माझ्या समक्ष काहीही घडलेले नाही.

सरतपास संपला.

**सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलट तपासात विचारण्याजोगे प्रश्न विचारण्यास परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली. उलट तपास - सरकार तर्फे**

२. आता मला माझ्या बयानातील अधोरेखीत भाग अ वाचून दाखविण्यात आला. तसे काही घडले नव्हते. तसे माझ्या बयानात पोलिसांनी का लिहून घेतले याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री अहीरराव यांचे मार्फत**

३. नाकारला.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,
स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.

दिनांक - १०.०२.२०२६